नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०५/२०२४ (बुधवार) दुपार

## गैरकायदयाची मंडळी जमवुन जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बोरी** :- फिर्यादी नामे- सौ. ललीता गजानन वघाडे, वय ३० वर्ष रा. तारसी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे अप. क्र. १४४/१५ कलम १४३, १४७, ४५२, ३२४, ३२६, ३०७ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात मृतक आरोपी १) प्रशांत मारोती तांगक्से. २) उत्तम डोमुडजी निवारे ३) शेषराव डोमुडजी नेवारे. ४) मंगला अमांडरे. ५) पुष्पा डोमडुजी नेवारे ६) गणेश जराटे यांच्या भावाचा खुन जखमी नामे- जिवन दत्तुजी ठाकरे, वय ३९ वर्ष, रा. तारसी याने करवुन घेण्याच्या संशयावरून नमुद आरोपीतांनी गैरकायदयांची मंडळी जमा करून फिर्यादीच्या घराचे दार तोडुन घरात प्रवेश करून फिर्यादीचा भाऊ जखमी यास जीव घेण्याच्या उददेशाने आरोपीतांनी लाठया काठयाने व दंगडाने डोक्यावर मारूण गंभीररित्या जखमी केले.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि अमोल दोंड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे १३ श्री भोसले सा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २२/०५/२०२४ रोजी मा. डी. जे १३ श्री भोसले सा. यांनी वरील नमुद गुन्हयात आरोपी क्र. २ व ३ यास कलम ३२४, ३४ भादवि मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ५००० रूपये दंड, दंड न भरल्यास ३ महिना साधा कारावास तसेच कलम ४५२, ३४ भादवि मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व १००० रूपये दंड, दंड न भरल्यास ०१ महिना साधा कारावास. आरोपी क्र. १ हा मरण पावलेला असुन आरोपी क्र ४, ५ व ६ यास गुन्हयात सहभाग असल्याचे सिदध न झाल्याने नमुद आरोपीतांस निर्दोष रिहा करण्यात आले.

सरकारचे वतीने एपीपी तेलगोटे साो यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ अनिल व्यवहारे यांनी मदत केली आहे.

## पोस्टे केळवद हद्दीतील जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक २१/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ १ इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन जंगली बोरगाव शिवारातील तलावाचे जवळ मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– मूकेश दुर्वेसिंग मारवाडी वय ३७ वर्ष, रा. छत्रापूर खदाण ता. सावनेर** हा अवैधरीत्या हातभट्टी लावुन मोहाफुल रसायन सडवा बाळगुन दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन नळी द्वारे मोहाफुल गावठी दारुची रनिंग भट्टी काढतांना आढळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) १० प्लास्टीक ड्रम मध्ये रसायण सडवा २००० लीटर किंमती ४००००/– रू. २) मोहाफुल गावठी दारू ५० लीटर किंमती २५००/७ रू ३) ५० किलो मोहाफुल २५००/– रू ४) १० खाली ड्रम १००००/–रू. ५) ०२ लोखंडी ड्रम मोहाफुल रसायनने भरलेले ४०००/– रू ६) ०२ लोखंडी खाली ड्रम २४००/–रू ७) ०३ टन लाकूड ७५००/– रू ८) ईतर दारू गाळण्याचे साहीत्य ४०००/–रू. असा एकूण ७२,९००/– रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे केळवद येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार राकेश साखरकर, पोउपनि विलास गेडाम, सफौ किशोर ठाकरे, पोहवा मंगेश धारपुरे, पोशि धोंडुतात्या देवकते यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर